Vol 6 Issue 1 Feb 2016

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad.

Mr. Dikonda Govardhan Krushanahari
Professor and Researcher ,
Rayat shikshan sanstha's, Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur.

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

Indian Streams Research Journal
International Recognized Multidisciplinary Research Journal
ISSN: 2230-7850 Impact Factor : 4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 1 | Feb - 2016




# उद्यमशील भारतातील सामान्य नागरीकाची भागीदारी – एक वाटचाल

प्रा. जयंत एम. बनसोड
वाणिज्य विभाग , गो.सी. टोम्पे कला, वाणिज्य
विज्ञान महाविद्यालय, चांदूर बाजार,

**सांराश :–**

भारतासारख्या विकसनशिल, तरूण देशात नविन व्यावसायीक, उ्द्योजक निर्माते तयार होणे ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. परंतु सामान्य नागरीक त्वरीत श्रीमंत होण्याच्या इर्षेने आसपासच्या श्रीमंत धनाढय लोंकाचा इतिहास जाणून घेतात. शहरातील प्रतिष्ठत व्यक्ति तेथील उद्योग व्यापाराचे १०० टक्के मालक असतात त्यांनी शुन्यातून विश्व कसे निर्माण केले. कशी मेहनत घेतली याची उदाहरणे दिली जातात. त्यासाठी कंपन्योच भाग, कर्जरोखे, लॉटरी, व अवैध व्यवसायं करण्याकडे त्यांचा कल वाढतो आणि सामान्य नागरीक फसतो. तेव्हा कोणत्या कंपनीचे केव्हा किती व कसे भाग घ्यावे त्याची खरेदी विक्री केव्हा करावी, त्यांनी कंपन्याचे ताळेबंद, ५-१०, वर्षातील प्रगती अहवाल तपासावा नंतरच भागाच्या खरेदीचा निर्णय घ्याव. यामधे काही फसवणूकीच्या जाहीराती असतात त्या ओळखूनच व्यवहार करावा. त्याने परिसरातील सामाजिक आर्थिक राजकिय परिस्थितीचा अभ्यास करावा. त्यानंतरच कंपन्याचे भाग खरेदी विक्री करण्याचा निर्णय घ्यावा म्हणजे सामान्य नागरीक हळूहळू श्रीमंत होण्याकडे व आपल्या बरोबर इतरांनाही श्रीमंत होण्यासाठी प्रेरणा देत राहील.

**प्रस्तावना :–**



भारता सारख्या विकसनशिल देशात नवनविन व्यावसायीक, व्यापारी, उद्योजक तयार होणे हि निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. परंतु भारतासारख्या १२५ कोटीच्या देशात व्यापार, उदयमशिल प्रगती व भागबाजारातील परतावा याची सामान्य नागरीक कशी सांगड घालतो हा एक मोठा प्रश्न आहे.

देशातील प्रत्येक नागरीकाला असे वाटते की आपण इतरांसारखे त्वरीत श्रीमंत व्हावे. याच लालसेनेच तो मोठमोठया शहरातील श्रीमंत, धनाढय, उद्योजक, व्यापारी यांचा इतिहास जाणून घेण्याचा प्रयत्न करतो. प्रत्येक महानगरात गेले की तेथील प्रतिष्ठीत श्रीमंत व्यक्तिंची नावे पूढे येतात त्यात प्रामुख्याने डॉक्टर, बिल्डर, व्यापारी दुकानदार यांच्या कौशल्य व कर्तबगीरीच्या कथा सांगीतल्या जातात काही प्रसंगी गावातील एकच व्यक्ति हो मोठा व्यापारी उद्योजक बिल्डर असतो म्हणजेच तेथील व्यवसायाचे ते १०० टक्के मालक असतात. फारच झाले तर परिवानातील सदस्य जवळचे नातलग, गणगोत किंवा मित्रपरिवारच यात भागीदार असतो. याच्या व्यवसायाचा व्याप जेवढा मोठा तेवढा त्यांचेकडे काम करणारा चाकरमानी (नोकरदार वर्ग) मोठा असून तो आपल्या मालकावर व व्यवसायाच्या प्रगतीवर खुश असतात म्हणजे सहाजीकच यामधून मालक चांगले उत्पन्न कमावर असेल आणि यांच्यापेक्षा अधिक वेगाने प्रगती करीत असेल.

व्यापार उद्योगाची सुरूवात अशाच प्रकारे होत असल्याचे दिसते. हा व्यापार एका शहरात, नंतर एका शहरातून दुसऱ्या शहरात पुढे प्रादेशिक स्तरावर, राज्य स्तरावर, देशपातळीवर आणि नंतर आंतराराष्ट्रीय (जागतीक) स्तरावर पोहचलेला दिसतो. याचासाठी मालकाला अधिकाधिक भांडवलाची गरज पडते त्याचप्रमाणे त्याचे सर्वीकडे नाव होण्यासाठी प्रचार प्रसार (जाहीराती) ची गरज निर्माण होते त्यासाठी तो व्यापाराला उद्योगाला कंपनीचे नाव देतो व भांडवलाची गरज पूर्ण करण्यासाठी गुंतवणूकदारांना

आकर्षीत करावे लागते. कंपनी हि लोकप्रिय व्हावी यासाठी तिचे भाग सार्वजनिकरित्या विकले जातात. त्यासाठी 'आयपीओ' आणतात व सामान्य जनता पैसे मोजून कंपनीचे भाग खरेदी करतात. त्यामूळे कंपनी भाग बाजारात सूचीबध्द (लिस्टेड) होते.

भारतासारख्या उद्‌यमशील (उद्योगप्रधान) देशात हि एक निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे नवनविन व्यावसायीक, व्यापारी उद्योजक हे तयार होतच राहतील यामधे बनावटपणा, भ्रष्टाचार, फसवणूक हे प्रकार चालणार आहेत तेव्हा सामान्य नागरीकांनी कोणत्या कंपन्याचे भाग खरेदी करावे. यासाठी कंपन्याच्या मागील स्थापनेपासूनच्या काळाचा ताळेंबद तपासून पहावा आणि कंपनी दरवर्षी किती नफ्यात आहे. भागधारकांना कोणत्या प्रकारचा किती लाभांश कशा प्रकारे वाटप करतो याचा सविस्तर अभ्यास करूनच निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. अन्यथा सामान्य नागरीक कंपन्याच्या बडेजाव दिखावू पणाला बळी पडून स्वतःचे नुकसान करून घेतल्या शिवाय राहणार नाही.

कंपन्या आपल्या कंपन्याचे भाग (शेअर्स) कशासाठी विकतात त्याची गरज काय? शेअर्स म्हणजेच भाग हिस्सा अंश होय. आपण ज्या कंपनीचे भाग खरेदी करतो त्या कंपनीचे त्या प्रमाणात हिस्सेदारी (मालकी) मिळवित असतो. आंशीक मालकी मिळविणारे आपण भागीदार हे कंपनीच्या व्यवसायाचेही भागीदार असतात. त्यांच्या कंपनीच्या नफा नुकसानात त्या प्रमाणात वाटा असतो कंपनी आपली आर्थिक क्रिया व्यावसायीक उलाढाल (लेनदेन) मोठया प्रमाणात करीत असेल तरच कंपनीची प्रगती होवून त्याचा वाटा आपल्या पदरात पडणार आहेच कंपनी सुचीबध्द असेल तर भाग बाजारात तिला खरेदीवर व विक्रेते असतात या खरेदी विक्रीतून कंपनीच्या भागात चढउतार होत असतात. याचा कंपनीच्या व्यवसाय परिणाम होत नाही किंबहुना कंपनीचा व्यवसाय चांगला सुरू असल्यास त्याचा सकारात्मक परिणाम, आणि जर वाईट व्यवसाय सुरू असल्यास त्याचा नकारात्मक परिणाम दिसून येणे स्वाभावीक असते.

सामान्य व्यक्ति हा भागधारक असेल तर त्याचे लक्ष हे कंपनीच्या भागाच्या भावापेक्षा कंपनीच्या व्यावसायीक वाटचाली कडे असणे आवश्यक आहे. म्हणूनच आपल्या गावातील प्रतिष्ठीत व्यक्तिंचा उद्योग व्यवसाय, आणि काहींनी भाग बाजारात सूचीबध्द कंपनी पर्यंत मारलेली मजल व नामांकीत कंपनी बनेपर्यंत केलेली प्रगती यामधील फरक सामान्य नागरीकांनी समजून घेतली पाहीजे. स्थानीक उद्योजक व्यापारी यांचेसोबत लागेबांधे नसले तरी आपण त्याचे कोरडे कौतुक करतो किंवा हेवा 'मत्सर' तरी करतो. अशा व्यक्तिचे कौतुक केले तरी काही मिळणार नाही परंतु हेवा करून स्वतःच त्रागा करून स्वतःच्या जीवाला त्रास देवून काहीही मिळणार नाही. म्हणून आहे त्या परिस्थितीचा अभ्यास करून मोठया व्यक्तिचे अनुकरण करण्यापेक्षा कंपनीच्या ताळेबंद व प्रगतीचा अभ्यास करून त्या कंपन्याचे भाग खरेदी विक्री करावेत म्हणजेच देश विदेशात पसरलेल्या व्यवसायाचे आपण भागीदार बनू शकू.

यामूधन हेच स्पष्ट होते की, आजच्या काळात काम धंदयाच्या पूर्वीच्या वाटपानुसार 'उत्तम शेती, मध्यम व्यापार व कनिष्ठ चाकरी' हि म्हण निरूपयोगी ठरून उत्तम व्यापार, मध्यम चाकरी व कनिष्ठ शेती झालेली दिसून येते. आज जाहीरातीच्या माध्यमातून घर बसल्या व्यवसाय करण्याची संधी, शिक्षण व पात्रतेची अट नाही फक्त लिहता वाचता येत असेल, संगणक हाताळता येत असेल, नेटवर्क करता येत असेल तर भरघोस उत्पन्न मिळवू शकता तूमची नौकरी, व्यवसाय, यामध्ये कोणतीही बाधा येणार नाही अशा प्रकारची कंपन्याच्या माध्यमातून प्रलोभने दिली जातात व याला अनेक सामान्य नागरीक बळी पडतात. कधी कधी आपले जवळील जमा संम्पत्ती (पुंजी) गमावून बसतात व त्यांचेसमोर पश्चाताप करण्याशिवाय गत्यंतर नसते.

सामान्य नागरीकांनी जागरूकपणे कंपन्याच्या आर्थिक उलाढालीचा, आर्थिक क्रिया प्रक्रिया, भागाच्या किंमतीतील चढ उतार याचा योग्य अभ्यास केला व काही मोजक्या कंपन्या निवडून प्रत्येक कंपनीचे समप्रमाणात भाग खरेदी केले व भावात वाढझाल्यावर गरजेनुसार विक्रि करून पगती पथावरील कंपन्याचे भाग खरेदी केले तर आपली नौकरी, व्यवसाय, पेशा धंदा सांभाळून एकदम मोठे न होता क्रमाक्रमाने मोठे (श्रीमंत) होण्याचा हा एकमेव मार्ग आहे. भाग बाजारातील गुंतवणूक हि इतर गुंतवणूकीपेक्षा चांगला परतावा देत असते. हि फक्त नौकरी सारखी सरळ वाट नसून ती चढउताराची वाट आहे. हे सर्वसामान्य नागरीकांनी लक्षात ठेवावे.

कंपन्याचे भागाची खरेदी विक्री करणारा सामान्य नागरीक हा चाणाक्ष (हुशार) बनला पाहीजे त्याला देशातील सामाजीक, आर्थिक, राजकिय परिस्थितीचे ज्ञान असणे व त्यामधे होणारा बदल त्याचा कंपन्याच्या भागभांडवलावर होणारा परिणाम, या बदलासाठी कारणीभुत घटक, हा प्रभाव किती काळ टिकणार आहे. याचा त्याने अभ्यास करावा व काही प्रमाणात जोखीम स्विकारूनच कंपन्याच्या भागाची खरेदी विक्री करण्याचा योग्य निर्णय घ्यावा भाग बाजारात निर्माण झालेल्या संधीचा वेळोवेळी त्याला फायदा घेता आला पाहीजे, बाजार चढउताराचे हेलकावे सतत सुरू असतात त्यामुळे त्याने आपले लक्ष विचलीत न करता स्थिर रहावे कारण हे हेलकावे अल्पकालीन असतात त्यामुळे तेजी आल्यास मंदी येणार व मंदी आल्यास तेजी निर्माण होईलच हिच बाजाराची अपेक्षा असते. म्हणून वेळोवेळी बाजारात निर्माण होणाऱ्या संधीचे ज्या व्यक्तिला सोनं करता येते तो व्यक्ती थोडया अल्पवधीतच गर्भ श्रीमंत, व्यापारी उद्योजक झाल्याशिवाय राहणार नाही.

याचकरीता आपल्या परिचयात असणारे आपल्या समोरच लहानाच्या मोठया झालेल्या कंपन्याचा दिर्घकाळ पाहील्यास व त्यांची साथ (मदत) केल्यास आपल्यालाही समर्पक लाभ मिळाल्या शिवाय राहत नाही. या व्यवसायात सामान्य व्यक्तिही अनुभवाने यशस्वी झालेला दिसतो. असा व्यक्ती मंदीच्या (बाजारातील तीव्र उताराच्या) काळातही अढळ (स्थिर) राहतो. टिकून राहतो.

याच कंपन्याच्या भाग बाजाराच्या तेजी मंदीच्या व्यापारा विषयी चालू आर्थिक वर्षातील देशाच्या अर्थव्यवस्था वाढीचा दर किती असेल यावरून अर्थतज्ञांमधे अरविंद सुब्रम्हण्यन, डॉ. रघुराम राजन यांच्यात मतभिन्नता असली तरी दोघेही देशाची अर्थव्यवस्था सुरळीत करण्यासाठी व विकास दरात वृध्दी करण्यासाठी प्रयत्नरत आलेत. सुब्रम्हण्यम हे देशाच्या अर्थव्यवस्थेला गती मिळावी यासाठी धोरणे आखतात तर डॉ. रघुराम राजण हे महागाई नियंत्रात ठेवण्याचे काम करतात. यामूधनच देशाच्या सामान्य नागरीकाच्या हिताला प्राधान्य देणे. देशाचा विकास करतांना मूठभर धनिकांच्या फायदयाचा विचार न करता सामान्य माणसाचे हित जपणे हाच प्रमुख उपदेश आहे. म्हणून देशात कर्ज बुडवणारी किती ही मोठी व्यक्ति असली तरी तिच्यावर कायदयाच्या चौकटीत

राहून कारवाई करण्याचे आदेश रिझर्व्ह बँकेच्या कर्मचाऱ्यांना पाठविलेल्या शुभेच्छा पत्रात दिले आहेत. म्हणून अर्थव्यवस्थेच्या मोटारीच्या ब्रेकवर डॉ. रघुराम राजन यांचा पाय आहे. तर ॲक्सलेटरवर सुब्रम्हण्यम यांचा पाय आहे. यामुळे गाडीच्या गतीवर योग्य प्रकारे नियंत्रण ठेवता येते. अर्थव्यवस्थेच्या गाडीची चार चाके म्हणजे सरकार कडून होणारी गुंतवणूक, खाजगी गुंतवणूक, सामान्य माणसाची बचत आणि निर्यात हि आहेत परंतु त्याच वेळेत सरकारची गुंतवणूक व सामान्य व्यक्तिची बचत व खर्च या चाकांनी वेग धरला आहे. म्हणजेच हि अर्थव्यवस्था चार चाकावरून दोन चाकांवर आलेली आहे. याचा सामान्य नागरीकांनी विचार करण्याची आवश्यकता आहे. सरकार रस्ता बांधणी, पायाभुत सुविधांचा विकास करण्याकडे जोर देत आहे यामुळे प्रत्यक्ष अप्रत्यक्ष रोजगार वाढविण्याचे उद्दिष्टे आहे. कि ज्यामुळे अर्थव्यवस्थेला गती मिळेल.

देशात अर्थवृध्दी होणे व महागाईवर नियंत्रण मिळविणे यासाठी सरकारी बँकाच्या गैरशिस्तीला आळा घालणे, अनुत्पादीत कर्जांना आळा घालणे बँकाचा ताळेबंद स्वच्छ करणे यासाठी देशाची अर्थव्यवस्था सामान्य माणसाचे हित जोपासण्याचे काम करीत आहे. यासर्व बाबीमधून हे स्पष्ट होते की देशातील सामान्य नागरीक हे लक्ष ठेवून त्याच्या विकासाचे व प्रगतीचे धोरण आखून राबविणे हिच खरी काळाची गरज आहे.

त्यासाठी सामान्य नागरीकांनी आपल्या आजूबाजूच्या अल्पकाळात श्रीमंत झालेल्या व्यक्तिंचा हेवा न करता सर्व बाबतीत सकारात्मकता ठेवूनच व देशपातळीवरील परिसरातील व आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा अभ्यास करूनच कंपन्याच्या भाग खरेदी विक्रीचा निर्णय घ्यावा म्हणजे भारतासारख्या विकसनशिल देशात उघमशील व्यापारी उद्योजक बनता येइल.

## संशोधन समस्या :–

भारतासारख्या प्रगतीशील देशात मध्यम वर्गीयांना आपला विकास करण्यासाठी व अल्पकाळात श्रीमंत बनण्याकरीता विविध कंपन्या संस्था, लोक जे आमिष देतात. त्यांना बळी पडून आपल्या कडे उपलब्ध संम्पत्ती गमावून अनेक लोक गरीब झालेले आहेत. अनेकांनी आत्महत्या केल्यात त्यामुळे सर्वसामान्य लोकांना कंपन्या त्यांचे भाग कर्जरोखे याबद्दल माहीती व्हावी या उद्देशाने दुय्यम संशोधन साधनाच्या आधारे घेतलेला हा एक शोध.

संशोधन पध्दती :–

आजच्या स्पर्धेच्या विज्ञान व तंत्रज्ञान युगात सर्वसामान्य जनता महागाई भाववाढ व जाहीरातीच्या माध्यमातून निर्माण झालेली इलेक्ट्रॉनीक, संवेदश वहनाची साधने प्राप्त करण्यातील जीवघेणी स्पर्धा यामधे भरडली जात आहे. तेव्हा लोंकामधे उपलब्ध कौशल्य अभ्यास प्रवृत्ती, ग्राहकाची मानसिकता या सर्व बाबींचा अभ्यास करून तुलना करण्यात येवून उपलब्ध संसाधने या आधारे निष्कर्ष काढण्यात आले आहेत. यावरील वृत्तपत्रे मासीके यामधून प्रसिध्द झालेले लेख, तत्ववेत्यांचे विचार, आर्थिक समीक्षा, चर्चा, वादविवाद, मते मतांतरे निवडून निर्देशन पध्दतीचा वापर करण्यात आला. सदर संशोधनासाठी वर्णेनात्मक व अंकेक्षणात्मक सारणीयन तुलनात्मक पध्दतीचा वापर करण्यात आला.

## निष्कर्ष :–

१.भारतासारख्या विकसशिल देशात व्यापारी उद्योजक तयार होणे हि निरंतर चालणारी प्रक्रिया आहे.
२.प्रत्येक गावात, शहरात मोठया झालेल्या व्यक्ति हयाच सामान्य नागरीकांसाठी प्रेरणा असतात.
३.साधारणपणे सामान्य नागरीकाची फसवणूक, लुबाडणूक होण्याचे प्रकार जास्त आढळतात. कारण त्यांना भागाच्या खरेदी विक्रीचा अभ्यास नसतो.
४.सामान्य व्यक्तिने कंपनीच्या भागाच्या मुल्याकडे लक्ष न देता कंपनीच्या व्यवसायीक (नफातोटा) वाटचालीचा बारकाईने अभ्यास करावा.
५.सामान्य नागरीकांनी कंपन्याच्या जाहीराती व प्रलोभने यांना बळी पडूनये.
६.भागाची खरेदी विक्रीतून नफा कमविणे ही नौकरी सारखी सरळ वाट नाही. तर चढ उताराची जोखीम स्विकारण्याची वाट आहे हे सामान्य नागरीकाने लक्षात ठेवावे.
७.भागाची खरेदी विक्री करतांना देशातील सामाजिक, आर्थिक राजकिय परिस्थितीचे भान ठेवावे म्हणजे होणाऱ्या बदलाचा भागाच्या चढउतारावर काय परिणाम होईल याचा अभ्यास करावा.
८.देशाचे प्रमुख धोरणे हे सामान्य माणसाचे हित जपणे आहे तेव्हा आर्थिक वाटचालीचा अभ्यास करूनच निर्णय घ्यावा.
९.देशात सामान्य व्यक्तिच्या प्रगतीकरीताचा योग्य धोरणे राबविली. जातात तेव्हा तो दृष्टीकोन समोर ठेवून प्रत्येकाने आपल्या कार्यात अग्रेसर रहावे.
१०.देशातील व देशाबाहेरील जागतिक ज्ञान, आंतरराष्ट्रीय स्तरावरील बदल याचा अभ्यास करून योग्य निर्णय घ्यावा.

## संदर्भ :–

१. विकासाचे अर्थशास्त्र–ज्योत्सना देशपांडे
२. भारतीय अर्थव्यवस्था – डॉ. प्रभाकर देशमुख
३.Dr. Ambedkar Approach to Buddhism – Dr. Bhalchandra Munagekar
४.अर्थशास्त्राचे सिध्दान्त – डॉ. प्रभाकर देशमुख
५.मासीके लोकराज्य म.शा.

६.दै. मतदार, दै. देशोन्नती, दै. लोकमत,दै.दिव्यमराठी मधील अग्रलेख व फुटलेख.
७.मुळ निवासी संघ – विचार
८.दै. लोकसत्ता दि. २५ जानेवारी २०१६ विजय मंत्री
९.दै. लोकसत्ता–वित्तीय सल्लागार गाजराची पुंगी पुंगीवाला

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org